# अतिवृष्टी : अमरावती विभागात 2.5 लाख हेक्टर शेतीचे नुकसान

### 767 गावांना फटका

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23) :** यंदाच्या खरीप हंगामात अमरावती विभागातील 767 गावांना अतिपावसाचा आणि अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून, 2 लाख 52 हजार हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. विभागातील पावसामुळे, पुरामुळे आणि विजेच्या दडपशाहीमुळे एकूण 55 लोकांचा मृत्यू झाला आहे. यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यांना या आपत्तीचा सर्वाधिक फटका बसला आहे, तर अमरावती जिल्ह्यात तुलनेने नुकसान कमी झाले आहे.



अमरावती विभागातील एकंदर स्थिती पाहिली तर 37 तालुके बाधित झाले आहे, ज्यामधील 767 गावे बाधित झाले आहे, 1479 हेक्टर शेती खरडून गेली आहे, 163 हेक्टर क्षेत्रामध्ये गाळ साचून नुकसान झाले आहे. या सर्व आकडेवारीतून अमरावती विभागातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर अतिपावसामुळे गंभीर परिणाम झाल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. अतिवृष्टीच्या निकषांनुसार काही भागातील शेतकऱ्यांना भरपाई मिळणार आहे, परंतु सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानासाठी निकष लागू नसल्यामुळे काही शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होण्याची शक्यता आहे.

### यवतमाळ जिल्ह्याला सर्वाधिक फटका

विभागीय महसूल खात्याच्या अहवालानुसार, यवतमाळ जिल्ह्यातील 1,75,627 हेक्टर आणि अकोला जिल्ह्यातील 51,056 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे 33 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. अमरावती जिल्ह्यात 5,811 हेक्टर पिके बाधित झाली आहेत. बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, बुलडाण्यात 9,933 हेक्टर, वाशीममध्ये 10,412 हेक्टर पिकांना फटका बसला आहे.

### 38 जणांचा मृत्यू

पावसाबरोबरच पुर आणि वीज पडल्यामुळे झालेल्या अपघातांमध्ये 38 जण पुरामुळे वाहून गेले, 10 जणांचा वीज पडल्याने मृत्यू, तर उर्वरित सात जणांचा पावसामुळे अपघाती मृत्यू झाला. शासनाने आतापर्यंत 34 प्रकरणांमध्ये मृतकांच्या कुटुंबियांना मदतदिली असून, उर्वरित 20 प्रकरणांचा चौकशी अहवाल प्रलंबित आहे.

# शेतजमिनीच्या बनावट मोजणी प्रकरणी गुन्हा कधी?


महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23) –** अमरावती जिल्ह्यातील परसोडा येथील 2 हेक्टर 42 आर शेतजमिनीच्या बनावट मोजणी शीट तयार करून न्यायालय व प्रशासनाची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी शेतमालक संतोष ताराचंद गुप्ता यांनी संबंधित आरोपींवर भारतीय दंड संहिता व सार्वजनीक अभिलेख अधिनियम 2005 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

संतोष गुप्ता यांनी ही जमीन 1999 साली विकत घेतली होती. 2002 मध्ये त्यांनी विक्री करार केला, मात्र खरेदी पूर्ण न झाल्याने सौदा रद्द झाला. तरीही आरोपींनी अधिकाऱ्यांशी संगनमत करून 2015 मध्ये गुप्ता यांच्या नावाने अर्ज दाखल केला.

त्यावर नरेश बरडिया यांनी सही केली. त्यानंतर मोजणी नोटीस काढून, गैरहजेरीतच मोजणी मान्य असल्याचा खोटा जबाब देण्यात आला. भूमापक व्ही. बी. रेवले यांनी मोर क्रमांक 509/15 बनावट मोजणी शीट तयार केली.

या दस्ताऐवजात प्रत्यक्षात कालवा नसताना नकाशात कालवा दाखवून न्यायालयास सादर करण्यात आला. यात भूमापक, लिपिक, शिरस्तेदार यांच्यासह अनेकांनी संगनमत केल्याचा आरोप आहे.विशेष भू अर्जन अधिकाऱ्यांनी लेखी कळविले की जमिनीतून कोणताही कालवा जात नाही. कालव्याकरिता अधिग्रहित झालेल्या जमिनीची स्वतंत्र यादीही उपलब्ध करून दिली आहे.



### माहिती न देण्याचा आरोप

संतोष गुप्ता यांनी भारतीय दंड संहिता कलमे 34, 120(ब), 196, 199, 464, 466, 467, 468, 471 तसेच सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 अंतर्गत कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी 2022 मध्ये माहिती अधिकाराखाली माहिती मागविली होती; मात्र माहिती जाणीवपूर्वक न दिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. सत्यप्रत कागदपत्रांसह गुप्ता यांनी तातडीने कारवाई करून न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

# तहसील कार्यालयातील रोजंदारी कर्मचाऱ्याची हत्या

## तहसील कार्यालयाजवळच रक्तबंबाळ अवस्थेत आढळला मृतदेह

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर, (दि. 23)–** शहरात सोमवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे. तहसील कार्यालयाजवळ अज्ञात व्यक्तींनी डोक्यावर लाकडी दांड्याने जबर वार करून एका इसमाचा खून केला. राजेश अभिमान इंगळे (वय 55, रा. सैनिक कॉलनी, दर्यापूर) असे मृताचे नाव आहे. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली असून, दर्यापूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.






ाजेश इंगळे हे तहसील कार्यालयातील नक्कल विभागात रोजंदारीवर कार्यरत होते. सोमवारी रात्री 9.30 वाजता मुलगा सौरभ याच्याशी त्यांचा फोनवर संवाद झाला होता. त्यानंतर 10 वाजता त्यांनी तहसील कार्यालयासमोर दुचाकी उभी करून काही लोकांशी संवाद साधल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मात्र, रात्री उशिरापर्यंत वडील घरी न परतल्याने मुलगा शोध घेत होता. त्यावेळी वडिलांची दुचाकी (एमएच 27 सीटी 0273) तहसील कार्यालयासमोर उभी आढळली; पण ते दिसून आले नाहीत. त्यानंतर मंगळवारी सकाळी तहसील कार्यालयाजवळील धनंजय लॉजच्या पाठीमागे व शेजारील इंग्लिश शाळेजवळ काही पालकांना संशयास्पद हालचाली दिसल्या. त्यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर घटनास्थळी उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी व ठाणेदार सुनील वानखडे पथकासह धावून गेले. त्यावेळी तेथे इंगळे यांचा मृतदेह दिसून आला. इंगळे यांच्या डोक्यावर जबर दांड्याचे वार झाल्याचे आढळले. यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी मृतदेह दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. या घटनेनंतर गुन्हे शाखा, फॉरेन्सिक पथक व श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले. अज्ञात आरोपींनी ही हत्या का केली याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. या हत्येमुळे दर्यापूर शहरात प्रचंड खळबळ माजली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दहा दिवसांनी नदीपात्रात सापडला बेपत्ता तरुणाचा मृतदेह

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 23) :** शहरातील खोलवाटपूरा परिसरातील 18 वर्षीय कुणाल किशोर बागडे हा तरुण दि. 13 सप्टेंबर रोजी माडू नदीच्या पाण्यात वाहून गेला होता. तब्बल दहा दिवसांच्या शोधानंतर आज (मंगळवारी) दि. 23 सप्टेंबर रोजी दुपारी 12 वाजता त्याचा मृतदेह मध्यप्रदेशातील सालबर्डी गावाजवळ नदीपात्रात अत्यंत कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

बारावीचे शिक्षण घेत असलेला कुणाल आपल्या दोन मित्रांसोबत सालबर्डी मार्गावरील अमराई परिसरात गेला होता. तेथे तो नदीत पोहण्यासाठी उतरला असता अचानक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या घटनेनंतर त्याच्या घरच्यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती. शोधकार्याकरिता अमरावती आणि बैतूल येथील बचाव पथकांना पाचारण करण्यात आले होते. मात्र, अनेक प्रयत्नानंतरही कुणालचा शोध लागला नव्हता.



अखेर आज त्याचा मृतदेह सालबर्डी पुलाखाली सापडला. घटनास्थळ हे मध्यप्रदेशातील मुलताई पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने तेथील पोलीस पथकासह मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल आठवले, पो.उ.नि. आकाश शिवणकर, रामकिसन नांदगावकर, तुषार चव्हाण, अंमलदार छत्रपती करपते, सुनील अकोलकर, मंगेश श्रीराव यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून मुलताई येथील दवाखान्यात शवविच्छेदनाकरिता पाठविण्यात आला. या वेळी मृतकाचे नातेवाईकही उपस्थित होते. पुढील तपास मध्यप्रदेश पोलीस करीत आहेत.

# शेतकऱ्याचा आक्रोश ; सहा एकर सोयाबीनवर फिरविला रोटाव्हेटर

## पंचनामा न झाल्याने शेतकऱ्याचे टोकाचे पाऊल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23)–** तिवसा तालुक्यातील शेंदोळा बुद्रुक येथील शेतकरी दयाराम राठोड यांनी प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात थेट आपल्या सहा एकर सोयाबीन पिकावर ट्रॅक्टरने रोटाव्हेटर चालवत संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे, या निषेधासाठी त्यांनी निमंत्रण पत्रिका छापून ग्रामस्थ आणि अधिकाऱ्यांनाही बोलावले होते.

या वर्षी झालेल्या सततच्या आणि मुसळधार पावसामुळे राठोड यांचे सोयाबीन पीक पूर्णपणे नष्ट झाले. वारंवार निवेदन दिल्यानंतरही महसूल विभागाकडून पंचनामा झाला नाही, असा त्यांचा आरोप आहे. निमंत्रण पत्रिकेनुसार राठोड यांनी सहा एकर शेतात रोटाव्हेटर चालवला. त्यानंतर त्यांनी 40 मेंढ्याही शेतात सोडून आपला संताप व्यक्त केला.



> सुजातपूर व शेंडोला परिसरातील सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक नष्ट झाले आहे. आम्ही अनेक वेळा निवेदन दिले, तरी कोणीही शेतात आले नाही. या सरकारी उदासीनतेच्या निषेधार्थ आम्हाला शेतातील पिकांवर रोटाव्हेटर चालवावे लागले.
>
> **दयाराम राठोड, शेतकरी**

दरम्यान, तिवसा महसूल विभागाने वेगळाच दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, पंचनामा आधीच करण्यात आला असून जिओ-टॅगिंगसह अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यावेळी दयाराम राठोड यांचा भाऊ उपस्थित होता, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

### शहरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती –** जिल्ह्यात आगामी काळात सण उत्सव साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरात पोलीस अधिनियमांतर्गत कलम 36नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू झाले आहे.

या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम 36 नुसार सर्व पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना दि. 5 ऑक्टोबर 2025च्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्याचे आदेश पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांनी दिले आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदार यादी जाहीर

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23) –** राज्यातील 32 जिल्हा परिषदा आणि 336 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार अमरावती जिल्हा प्रशासन कार्यान्वित झाला आहे.

प्रारुप मतदार यादीवर 8 ते 14 ऑक्टोबर 2025 या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. 1 जुलै 2025 हा अधिसूचित दिनांक म्हणून निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी 8 ऑक्टोबर 2025 रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर 14 ऑक्टोबर पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी 27 ऑक्टोबर 2025 रोजी जाहीर केली जाईल. निवडणूक विभागात मतदारांची नावे आणि पत्ते विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणे कायम ठेवले जातील. नवीन नावांचा समावेश किंवा नावे वगळणे, दुरुस्ती इत्यादी कामे राज्य निवडणूक आयोगाकडून थेट केली जात नाहीत. केवळ हरकती व सूचनांच्या आधारे मतदार यादीत होणाऱ्या चुका दुरुस्त केल्या जातील, असे सांगण्यात आले आहे.

# आरोपीला खाजगी हॉटेलवर थांबविले

## अमरावती पोलिसांची चौकशी सुरू | नाशिकच्या गोळीबार प्रकरणात गंभीर बाबी उघडकीस

महासागर प्रतिनिधी

**अमरावती (दि. 23) –** नाशिक शहरातील पंचवटी परिसरात 17 सप्टेंबर रोजी झालेल्या सागर जाधववरील गोळीबार प्रकरणाने नवे वळण घेतले असून त्यात अमरावती पोलिसांच्या भूमिकेवरच संशयाचे सावट आले आहे. आरोपी शेखर निकम हा अमरावती जेलमध्ये शिक्षा भोगत असताना, जुन्या केसच्या अनुषंगाने अमरावती पोलीस त्याला नाशिकला न्यायालयात घेऊन गेले होते. मात्र अधिकृत ठिकाणी जसे की,पोलीस कोठडीत ठेवण्याऐवजी त्याला एका खाजगी हॉटेलवर मुक्कामाला



थांबविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या मुक्कामादरम्यान माजी भाजप नगरसेवक जगदीश पाटील याने हॉटेलवर येऊन शेखर निकमची भेट घेतल्याचा आरोप आहे. त्याच वेळी सागर जाधव याच्या हत्येचा कट रचण्यात आला, असे पोलिस तपासातून पुढे आले. यानंतर नाशिकच्या पंचवटीत 17 सप्टेंबरला सागर जाधववर गोळीबार झाला. तो गंभीर जखमी झाला असून उपचार सुरू आहेत. अमरावती पोलिसांनी आरोपीला खाजगी हॉटेलवर थांबविण्याची बाब उघड झाल्यानंतर अमरावती शहराचे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे संकेत त्यांनी दिले.

### टोळीयुद्धाचा मागोवा

2017-18 साली किरण निकमच्या खुनानंतर निकम गँग व उघडे गँगमध्ये वैर पेटले होते. त्याचाच बदला म्हणून निकम गँगच्या शूटरांनी सागर जाधववर गोळीबार केला. याप्रकरणी अकरा जणांना अटक झाली असून, जगदीश पाटीलला 26 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. शेखर निकमविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई झाली असून त्याच्यावर नऊ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तरीही अमरावती पोलिसांच्या सैलपणामुळे त्याला हॉटेलवर थांबवले गेल्याने संपूर्ण पोलिस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### संभाजीनगरात 2 लाख 17 हजारांची चोरी

**अमरावती –** बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जुनी वस्ती माताफैल येथील संभाजीनगरात अज्ञात चोरट्यांनी बंद घर फोडून रोख व सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह तब्बल 2 लाख 17 हजार 750 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. बांधकाम कंत्राटदार आशीष प्रभाकरराव पंडितकर (35) हे 20 सप्टेंबरच्या दुपारी आपल्या आईकडे रुग्णालयात गेले होते. त्यावेळी घराला कुलूप लावून ते निघाले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजेच 21 सप्टेंबरला दुपारी ते परतले असता, घराचे मुख्य दाराचे कुलूप तुटलेले दिसले. दरवाजा आतून बंद असल्याने त्यांनी मागील दरवाजाकडे पाहिले असता तो उघडा आढळला. घरात प्रवेश केला असता सर्व सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळले.

# 'नाळ 2' फेम श्रीनिवास पोळकेला दुसऱ्यांदा राष्ट्रीय पुरस्कार

## अमरावतीच्या शिरपेचात पुन्हा मानाचा तुरा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 23)–** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आज(मंगळवार 23 सप्टेंबर) दिल्लीत 71 वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला. द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. काही दिवसांपूर्वीच या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती. यंदाच्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये मराठी बालकलाकारांनी डंका वाजवला. 5 बालकलाकारांना हा पुरस्कार देण्यात आला. तर त्यापैकी 4 बालकलाकार हे मराठी आहेत. नाळ 2 सिनेमातील त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोळके, भार्गव जगताप यांना सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्काराने गौरविण्यात आले. तर जिप्सी सिनेमातील कबीर खांडारे यालाही सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्काराचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सुकृती वेणी बंडरेड्डी या तेलुगु बालकलाकाराला गांधी तथा चेत्तु सिनेमासाठी पुरस्कार देण्यात आला. अमरावती येथील श्रीनिवास पोकळेचा हा दुसरा राष्ट्रीय पुरस्कार आहे.

राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्यासाठी आलेल्या चिमुकल्या त्रिशाने सगळ्यांचीच मनं जिंकून घेतली. त्रिशा साडी नेसून राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्यासाठी आली होती. तिचा आत्मविश्वास पाहून सगळेच आश्चर्यचकित झाले. टाळ्यांच्या गडगडाटात त्रिशा सगळ्यांनी प्रोत्साहन दिलं. तर कबीर खांडारेनेदेखील धोतर, फेटा असा मराठमोळा पोषाख करत राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारला. 'नाळ 2' सिनेमाने राष्ट्रीय पुरस्कारात डंका मारला आहे. या सिनेमाने तब्बल 5 पुरस्कार नावावर केले आहेत. सर्वोत्कृष्ट बालचित्रपटासाठी 'नाळ 2' ला गौरविण्यात आले तर




दिग्दर्शकालाही राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर तीन बालकलाकारांना सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार मिळाले.

# चांदूर बाजार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा!

### तहसीलदारांना निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**चांदुर बाजार, (दि. 23)–** मागील काही आठवड्यापा सून सततच्या पावसाने चांदूरबाजार तालुकाक्यासह जिल्ह्याभरामध्ये मोठ्या प्रमाणात सततचा पाऊस सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालेलं आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे शेती पिकांना कोंब फुटण्यास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे पीक आत्ताच नष्ट झाल्यासारखे दिसून येत आहे.



या सर्व प्रकारामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होताना दिसून येत आहे. पहिले शेतकरी कर्जबाजारी झाला असून अजून या प्रकारामुळे त्यामध्ये भर पडलेली आहे. या सर्व गंभीर प्रकरणाची दखल घेऊन आपण चांदूरबाजार तालुक्यासह जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सर्व शेतकऱ्यांना एकरी सरसकट पन्नास हजार रुपयाची आर्थिक मदत द्यावी, असे निवेदन लोकविकास संघटना यांनी दिले यावेळी निवेदन लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांचे नेतृत्वात देण्यात आले. निवेदन देताना रमन लगोटे, विजय राऊत ,कमलेश धाडसे, ज्ञानेश्वर चराटे, इरफान सौदागर, जावेद पठाण, आकाश खेलदार, शाम पारीसे, श्रेयश बर्वे सह अन्य शेतकरी उपस्थित होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# चंद्रभागा प्रकल्पामुळे शेतकरी, नागरिक संकटात

## ठिय्या आंदोलनाचा शिवसेनेचा ( ठाकरे गट ) इशारा

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, ( दि. 23 ) :** अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा प्रकल्प, सांगवा बु. येथे बॅरेजचे पाणी अडवण्यात आल्यामुळे चंद्रभागा व सापन नदीकाठावरील शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त झाले आहे. पाण्याखाली शेतजमिनी, घरे, मंदिरे गेल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे.

या प्रकल्पाअंतर्गत बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनींचे भूसंपादनच झालेले नाही, तसेच घरे व मंदिरे यांचे पुनर्वसनही करण्यात आलेले नाही. थेट पाणी अडवून शेतीचे रस्ते बंद करण्यात आल्याने शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की प्रकल्प अधिकाऱ्यांनी जमीन अधिग्रहण व पुनर्वसनात गंभीर अनियमितता केली असून, लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे मुद्दाम दुर्लक्ष केले आहे. यामुळे संतप्त प्रकल्पग्रस्तांनी जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे (ठाकरे गट) यांच्याकडे धाव घेतली.24 सप्टेंबर 2025 पर्यंत नागरिकांनी दिलेल्या निवेदनावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यास 25 सप्टेंबर रोजी निभारी गाव, सापन नदीकाठी ठिय्या आंदोलन उभारले जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, प्रश्न निकाली न निघाल्यास हे आंदोलन टप्प्या-टप्प्याने तीव्र करण्यात येईल.असेही पडोळे यांनी म्हटले आहे या संपूर्ण प्रकरणामुळे प्रशासनाविरुद्ध शेतकरी आणि नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. भूसंपादन व पुनर्वसनाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील असा निर्धार प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केला आहे.



# प्रो.राम मेघे कॉलेज ला राष्ट्रीय स्तरावरील तीन पुरस्कार

**अमरावती, ( दि. 23 ) :** प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट या प्रतिष्ठित अभियांत्रिकी महाविद्यालयाला एज्युस्किल कनेक्ट 2025 या शिमला येथे पार पडलेल्या राष्ट्रीय परिषदेत एकाचवेळी तीन राष्ट्रीय पुरस्कारांचा सन्मान मिळाला. हा क्षण महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांना प्राचार्य उत्कृष्टता पुरस्कार प्रा. के.के. अग्रवाल (सार्क विद्यापीठाचे कुलगुरू व एनबीएचे माजी अध्यक्ष) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दुसरा पुरस्कार प्रशिक्षण, प्लेसमेंट व व्यवस्थापन अभ्यास विभागातील उत्कृष्टता या श्रेणीत डॉ. शशिकांत थोरात (डीन टी अँड पी व विभाग प्रमुख) यांना राघव दास (सल्लागार, एआयसीटीई व सहसचिव, राज्यसभा) यांच्या हस्ते देण्यात आला. तर तिसरा



पुरस्कार सर्वोत्कृष्ट अभियांत्रिकी महाविद्यालय 2025 या श्रेणीत डॉ. सुभाजीत जगदेव (सीईओ, एडुटेक) यांच्या हस्ते महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार प्राचार्य डॉ. अजय ठाकरे, डॉ. लोभस घडेकर व डॉ. शशिकांत थोरात यांनी एकत्रितपणे स्वीकारला. तीन दिवसीय या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात हिमाचल प्रदेशचे राज्यपाल महामहीम प्रताप शुक्ला, सुप्रसिद्ध अभिनेते आशिष विद्यार्थी तसेच

> महाविद्यालयाने घेतलेल्या परिश्रमाचे हे फळ आहे. मी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन करतो.
>
> **डॉ.नितीन धांडे,**
> **अध्यक्ष, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी**

अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. हे पुरस्कार महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्ता, प्रभावी नेतृत्व आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचे प्रतीक असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, तसेच कार्यकारी सदस्यांनी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

# शिक्षकांचा प्रतिनिधी शिक्षकच असावा!

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि. 23 )** – शिक्षक हा देशातील सर्वात महत्त्वाचा घटक असून तो प्रामाणिक, सुशिक्षित, सामाजिक-सांस्कृतिक बांधिलकी जपणारा, जागरूक व अभ्यासू आहे, असे मानले जाते. त्यामुळे महाराष्ट्र विधान परिषदेवरही अशाच हुशार, सामाजिक भान असणाऱ्या व्यक्तींना प्रतिनिधित्व मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

दिनांक 20 सप्टेंबर 2025 रोजी सिद्धेश मंगल कार्यालय, अंजनगाव सुर्जी येथे झालेल्या राज्य शिक्षक संघाच्या तालुका अधिवेशनात आ.



संजय खोडके अध्यक्षस्थानी होते. उद्घाटक अरविंद मंगळे, प्रमुख अतिथी दिलीप कडू, भोजराज जी काळे, रवींद्र गोळे, जगनदादा हरणे, फादर जोसेफ तवामणी, विवेक संगई, अखिल सुफी, डॉ. अमर सारडा आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात आ. संजय खोडके यांनी, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न पोटतिडकीने सोडवणारे कार्यकर्ते राज्य शिक्षक संघात असून, त्याचे नेतृत्व दिलीप कडू करीत आहेत.

अशा व्यक्तीच्या पाठीशी सर्वांनी उभे राहावे, असे आवाहन केले. जिल्हा संघटक विजय ठाकरे यांनी प्रास्ताविक केले. गोपाल डालके यांनी शिक्षण क्षेत्रातील अडचणींवर स्वरचित कविता सादर केली. उद्घाटक अरविंद मंगळे यांनी पवित्र पोर्टल मधील शैक्षणिक पात्रतेच्या त्रुटी तसेच अंशत:

### राज्य शिक्षक संघाच्या अधिवेशनातील सूर

अनुदानित शाळांवरील धोरण बदलासंदर्भात शासनाचे दुर्लक्ष अधोरेखित केले. दिलीप कडू यांनी प्रा. बी.टी.देशमुख यांच्या सभागृहातील प्रखर युक्तिवादामुळे शिक्षकांसाठी अनेक प्रश्न निकाली निघाल्याचे सांगून, पूर्वी मिळवलेल्या सुविधाही हळूहळू निसटत चालल्या आहेत, अशी खंत व्यक्त केली. राज्य शिक्षक संघाचे सरचिटणीस भोजराज जी काळे यांनी, शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांची खरी जाण असणाऱ्या आणि कोणत्याही आमिषाला बळी न पडणाऱ्या व्यक्तीलाच प्रतिनिधी म्हणून पाठवा, असे आवाहन केले.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भव्य पथसंचलन

### अचलपूरमध्ये विजयादशमी निमित्त आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, ( दि. 23 ) :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) शताब्दी वर्षानिमित्त यंदाचा विजयादशमी उत्सव अचलपूरमध्ये विशेष ठरणार आहे. 1925 साली डॉ. केशवराव हेडगेवार यांनी काही स्वयंसेवकांसह संघाची मुहूर्तमेढ रोवली होती. आज शंभर वर्षांच्या कालखंडात संघटनेने देश-विदेशात विस्तार करत कोट्यवधी स्वयंसेवकांची बलाढ्य शक्ती उभारली आहे.

शिस्त, सेवा आणि राष्ट्रभक्ती या तत्त्वज्ञानावर चालणाऱ्या संघाने गेल्या शतकभरात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सेवा




उपक्रमांद्वारे राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. यंदा शताब्दी वर्षानिमित्त देशभरात भव्य कार्यक्रमांचे आयोजन होत आहे.

अचलपूर मध्ये विजयादशमीच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य पथसंचलन काढण्यात येणार आहे. हा संचलन सोहळा 27 सप्टेंबर रोजी दुपारी 4 वाजता सावरकर नगर बावीशी येथून सुरू होईल. नगरातील प्रमुख मार्गांवरून संघाच्या गणवेशात सज्ज स्वयंसेवकांचा हा शिस्तबद्ध संचलन सोहळा पार पडणार आहे. नगर कार्यवाह यांनी सर्व स्वयंसेवकांना गणवेशात वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. पथसंचलन हे केवळ मिरवणूक नसून, शिस्तबद्धतेचे आणि राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडवणारा प्रेरणादायी सोहळा ठरणार आहे.

# मदतीचा हात देऊन साजरा केलेला वाढदिवस समाधान देतो-दिपाली धरमठोक

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.23 )** – कोणताही वाढदिवस केवळ केक कापून किंवा जल्लोषात साजरा करण्यापेक्षा, जर तो समाजातील गरजूंना मदतीचा हात देऊन साजरा केला, तर त्यातून मिळणारे समाधान अधिक चिरकाल टिकते, असे प्रतिपादन दिपाली गजानन धरमठोक यांनी व्यक्त केले. त्यांच्या कन्या प्रीती गजानन धरमठोक हिचा वाढदिवस अचलपूर-चांदूरबाजार रोडवरील विसावा वृद्धाश्रमात साजरा करण्यात आला. या वेळी वृद्धाश्रमातील



महिला व पुरुषांना जीवनावश्यक वस्तू आणि फराळ वाटप करून त्यांच्या सोबत दिवस घालविला. या उपक्रमात शौर्य धरमठोक, सामाजिक कार्यकर्त्या नीता बोचरे, शारदा घोगरे, संगीता कुले, वर्षा बारब्दे, लक्ष्मी शिंगणे, कुशाल गांगणे, सोपान सातपुते, वामन वालेकर, प्रणव ढाकरे, स्वराज घोगरे, मैहियन शिंगणे आदी मान्यवर सहभागी झाले होते. तसेच विसावा वृद्धाश्रमाचे प्रमुख शांतीलाल बुंदिले आणि आश्रमातील सर्व वृद्ध स्त्री-पुरुष या कार्यक्रमाला उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त झालेला हा उपक्रम उपस्थितांना भावला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांनी या वेगळ्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. मदतीच्या हातातून मिळणारा आनंदच खरी जीवनशैली असल्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

# राजुरा येथे कृषी विभागातर्फे शेतकरी प्रशिक्षण

### सोयाबीन, तूर व कपाशीच्या शेतांना दिली भेट

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.23 )**– तालुक्यातील राजुरा येथे राष्ट्रीय खाद्यतेल गळीत धान्य अभियान अंतर्गत तालुका कृषी अधिकारी संचित ढाकरे यांचे मार्गदर्शनाखाली गाव पातळीवरील शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षणास कृषी विज्ञान केंद्र, घातखेड येथील विशेष विषयतज्ञ पी. एन. मेंढे तसेच एस. आर. राठोड उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी हनुमान मंदिराचे व्यवस्थापक सुभाष सूर्यवंशी होते. यावेळी ग्रामपंचायत सदस्य भूषण काळे, मंडळ कृषी अधिकारी ए. जी. आडे, उप कृषी अधिकारी व्ही. एस. बोबडे व सहाय्यक कृषी अधिकारी सुधा नितीन जाधव उपस्थित होते. यावेळी पी. एन. मेंढे यांनी



राष्ट्रीय खाद्यतेल गळीत धान्य अभियान संकल्पना, उद्देश व त्याचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच उपस्थित शेतकऱ्यांचे शंकांचे निरसन केले. कार्यक्रमावेळी वरिष्ठ शास्त्रज्ञांनी सोयाबीन, तूर व कपाशीच्या प्लॉटला क्षेत्रीय भेट देऊन उपस्थित शेतकऱ्यांना सोयाबीन पीक सध्या शेंगा पकवता अवस्थेत असून काढणी करतांना घ्यावयाची काळजी, अवकाळी पावसातील पीक नियोजन , तसेच सोयाबीन तूर व कपाशी या पिकावरील कीड रोग व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कमी खर्चात उत्पादन वाढ याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी ए. जी. आडे यांनी प्रास्ताविक करतांना महा कृषी विस्तार एआय ॲप बाबत माहिती दिली. व उपकृषी अधिकारी व्ही. एस. बोबडे यांनी महाडीबीटी वरील योजना व सर्व शासकीय योजनांची माहिती दिली व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी सुधा नितीन जाधव व सहाय्यक कृषी अधिकारी दीपक राऊत यांनी परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व राजुरा वासियांनी सहकार्य केले.

# जीके टीएमटीतर्फे अभियंत्यांची बैठक

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव-सूर्जी, दि. 23 :** जीके टीएमटीने दिनांक 16 सप्टेंबर रोजी येथील हॉटेल वृंदावन ग्रँड पॅलेस येथे प्रतिष्ठित अभियंत्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला सिव्हिल इंजिनिअर आणि आर्किटेक्ट यांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त सहभाग होता. अंदाजे 48 इंजिनिअर उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

या बैठकीसाठी जीके टीएमटीचे सीनियर टेक्निकल मॅनेजर सिद्धांत अग्रवाल, मार्केटिंग अँड ब्रँडिंग मॅनेजर प्रमोद जयस्वाल आणि एरिया सेल्स ऑफिसर तुषार बुढारकर हे विशेष उपस्थित होते. स्थानिक डीलर हंतोडकर अँड सन्स चे संचालक कृष्णा हंतोडकर आणि तुळजाई हार्डवेअर (दर्यापूर) चे संचालक चेतन नवलकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. सिद्धांत अग्रवाल यांनी जीके टीएमटीच्या दर्जेदार उत्पादनाची सविस्तर माहिती देताना सांगितले की, जीके टीएमटी डीआरसीएलओ आयरनपासून बनवले जाते आणि कंपनीच्या इंटीग्रेटेड प्लांटमधून उच्च दर्जा राखला जातो. एनएबीएल लॅब प्रमाणित गुणवत्ता असल्यामुळे जीके टीएमटी राष्ट्रीय व राज्यस्तरीय विविध प्रोजेक्टसाठी मान्यता प्राप्त आहे. सध्या जीके टीएमटी मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, उडीसा, तेलंगणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे. ऋष्ठस्ह्, मेट्रो स्टेशन, राष्ट्रीय महामार्ग आणि सरकारी प्रोजेक्टमध्येही जीके टीएमटीचा समावेश होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रम माहितीपूर्ण ठरला.

# सणासुदीच्या काळात पुन्हा वाहतूक कोंडी

### जयस्तंभ, राजकमल चौक, इर्विन चौक बनले वाहतूक कोंडीचे प्रमुख केंद्र

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 23 )** नवरात्रोत्सव सुरू झाला असताना, राजकमल रेल्वे उड्डाणपूल बंद केल्याने अमरावती शहरातील सर्वात वर्दळीच्या भागात सर्वाधिक वाहतूक कोंडी झाली आहे. जयस्तंभ चौक, शाम चौक, सरोज चौक, चित्रा आणि इर्विन चौक. सण आणि सततच्या सुट्ट्यांमुळे रस्ते गर्दीने भरले आहेत आणि सकाळी 11 ते रात्री 10 वाजेपर्यंत चौकांवर गर्दीमुळे नागरिकांच्या समस्या आणखी वाढल्या आहेत. वाढत्या वाहतुकीमुळे आणि वाहनांच्या धडपडीमुळे आता चौकाचौकांवर वाद निर्माण होत आहेत. वाहतूक कर्मचाऱ्यांना प्रचंड वाहतूक कोंडी व्यवस्थित करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

शहरात वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. रेल्वे स्टेशन, बस स्टँड, जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, कॅम्प



आणि गाडगेनगरकडे जाणाऱ्या वाहनांना एकच मार्ग उपलब्ध आहे. अंबा-एकवीरा देवी मंदिराकडे जाणारे भाविक पायी आणि वाहनाने येत आहेत. त्यामुळे चालकांमध्ये पुढे जाण्यासाठी शर्यती सुरू आहेत. रेल्वे स्टेशन किंवा बस स्टँडकडे जाणाऱ्यांना मालवीय चौकातून इर्विन चौकात पोहोचावे लागते, परंतु श्याम चौक, जयस्तंभ चौक आणि मालवीय चौकात मेगाब्लॉकसारखी परिस्थिती निर्माण होते. डावीकडे असलेल्या इर्विन हॉस्पिटलकडे जाणाऱ्या वाहनचालकांनाही लांब प्रतीक्षा करावी लागते. गाडगेनगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांनाही मालवीय चौकातून इर्विन चौकात परतावे लागते. तर कॅम्प, हमालपुरा आणि रुक्मिणी नगरकडे जाणारे वाहनचालकही गर्दीत अडकत आहेत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. काही वर्षांपूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख बँकेसमोर बसवलेल्या दुभाजकामुळे हा मार्ग आधीच बंद करण्यात आला होता. त्यामुळे सध्याची परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे. सध्या या समस्येवर उपाय म्हणून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. नागरिकांना सध्याची परिस्थिती सहन करावी लागत आहे.

# धार्मीक स्थळावरील लाऊडस्पीकरवरील बंदी उठवा



### एमआयएमची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, ( दि. 23 )**– ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) अचलपूर शहराच्या वतीने आज अचलपूर येथील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) तथा ठाणेदार गजानन मेहत्रे यांना एक लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये धार्मीक स्थळावर लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी पुन्हा देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

हे निवेदन साजिद फलारी आणि सय्यद मोहसिन यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आले होते.निवेदन देताना अचलपूर शहरातून शहराध्यक्ष मोहम्मद आदिल, युवा अध्यक्ष शेख अमजद, महासचिव काशिफ मिर्झा उपस्थित होते.परतवाडा शहरातून शहराध्यक्ष इमरान खान, रेहान खान, रफीक आणि इतर सदस्य उपस्थित होते. अचलपूरकडून आरिफ, जुबेर, एजाज तसेच अनेक सदस्यांनी उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शवला.

# फिनले मिल कामगारांची आक्रोश रॅली

## अन्यायाविरुद्ध भारतीय मजदूर संघाचा आवाज



महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा, ( दि. 23 )** जिल्ह्याचे वैभव मानली जाणारी अचलपूर येथील फिनले मिल गेली अनेक वर्षांपासून बंद आहे. त्यामुळे शेकडो कामगार उपासमारीच्या स्थितीत आले आहेत.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) अंतर्गत असलेल्या इतर तीन मिल्सना मागील तीन वर्षांचा बोनस मिळाला असताना फिनले मिल कामगारांना मात्र या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे. याच अन्यायाविरुद्ध भारतीय मजदूर संघ (अमरावती जिल्हा) यांच्या वतीने 21 सप्टेंबर रोजी परतवाडा येथे आक्रोश रॅलीचे आयोजन करण्यात आले.

### रॅलीची सुरुवात व नेतृत्व

रॅलीची सुरुवात शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर सूर्यकमल येथे संवाद सभेचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे नेतृत्व भारतीय मजदूर संघाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र दौड यांनी केले.

### लढा सुरूच राहील

सभेत कामगारांना संबोधित करताना दौड म्हणाले, भारतीय मजदूर संघ सदैव कामगारांच्या हक्कासाठी लढत आला आहे आणि भविष्यातही खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा राहील. त्यांनी स्पष्ट केले की, फिनले मिल कामगारांचा न्याय मिळवण्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

### मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला गजानन कोल्हे (भा.ज.पा. ओबीसी मोर्चा प्रदेश महामंत्री), भाजप नेते अभय माथने, तसेच भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी रुपेश राऊत, हेमंत मस्करे, कृपालसिंह पवार, प्रल्हाद कोतवाल, श्रीकांत म्हातरे, गोपाल शेवतकर उपस्थित होते. फिनले मिल कामगार संघाचे छोटू लाडोले, विलास चावरे, गिरीश भोयर यांच्यासह इतर अनेक पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### एकमताने निर्धार

आक्रोश रॅली आणि सभेत असंख्य कामगार व कार्यकर्त्यांनी एकजुटीने सहभाग घेतला. या वेळी सर्वांना समान न्याय मिळावा या उद्देशाने कामगारांनी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. मान्यवरांनी स्पष्ट केले की, हा आंदोलनाचा टप्पा फिनले मिल कामगारांच्या न्यायासाठी निर्णायक ठरणार आहे. प्रशासनाने कामगारांच्या मागण्या तातडीने मान्य न केल्यास लढ्याची तीव्रता आणखी वाढवली जाईल, असा इशारा देखील सभेतून देण्यात आला.


## जाहीर नोटिस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे विना विजयराव ठाकरे यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे बडनेरा, प्रगणे बडनेरा, शेत सर्वे क्रं. 195/3 प्लॉट क्रं. 2, ता. आणि जिल्हा. अमरावती.

चतु सीमा: पूर्वे: किरण छाजेडा यांचा प्लॉट
पश्चिम: नीता ओझा यांचा प्लॉट
उत्तर: सर्विस गल्ली
दक्षिण: लेआउट रस्ता

सदर मिळकत माझे पक्षकार विना विजयराव ठाकरे यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी tkarsh Small Finance Bank Limited. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 15/11/1996 रोजीचे दस्त क्र. 3961 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी// पतसंस्था/सहकारी/ इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

